राज्यातील बंद पडलेल्या, मान्यता रद्द केलेल्या तसेच सद्यस्थितीत चालू असलेल्या विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांचे हस्तांतर / स्थलांतर करण्याकरीता अंतराच्या निकषामध्ये सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र.विभशा-२०१९/प्र.क्र.६२८/ विजाभज-२
मंत्रालय, विस्तारभवन, मुंबई-३२
दिनांक : २३ जुलै, २०१९

वाचा:- १. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय क्रमांक विभशा-२००७/प्र.क्र.९२/मावक-६, दि.०१.०८.२००७

२. विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक विभशा-२०१२/प्रक्र.२२१/विजाभज-२ दि.२४.०४.२०१८

३. विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक विभशा-२०१२/प्रक्र.२२१/विजाभज-२ दि.२१.०९.२०१८

४. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश सिव्हील ॲप्लीकेशन क्र.९३८४/२०१४, दि.०५.०३.२०१९.

प्रस्तावना:-

राज्यातील बंद पडलेल्या, मान्यता रद्द केलेल्या तसेच सद्यस्थितीत चालू असलेल्या आश्रमशाळा अन्य संस्थांना हस्तांतरीत / स्थलांतरीत करण्यासाठी तसेच सध्या कार्यरत असलेल्या आश्रमशाळा अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यासाठी किंवा इतर संस्थेकडे हस्तांतरीत करण्यासाठी संदर्भ क्र. ०१ ते ०३ मधील शासन निर्णयान्वये कार्यपद्धती नमूद करण्यात आलेली आहे. यानुसार संदर्भ क्र. ०१ नुसार विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांचे हस्तांतर / स्थलांतर १० कि.मी. परीसरामध्ये करण्याबाबत धोरण निश्चीत करण्यात आले होते. तथापि विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा स्थलांतरीत करण्याबाबत अंतराबाबत शासन निर्णय दि.२४.०४.२०१८ अन्वये आश्रमशाळा ज्या ठिकाणी स्थलांतरीत करावयाची आहे ती जागा पूर्वीच्या ५० कि.मी. अंतरापेक्षा जास्त अंतरावर असू नये तसेच प्रस्तावित आश्रमशाळा त्याच गावात किंवा नजीकच्या गावात सुरू होईल अशा प्रस्तावांना प्राधान्य द्यावे व मान्यता रद्द केलेल्या शाळेपासून जवळच्या शाळेला प्राधान्य द्यावे, अशी तरतुद करण्यात आली आहे. तथापि अशा बंद पडलेल्या आश्रमशाळा दूरवर हस्तातर/ स्थलांतर केल्याने सदर आश्रमशाळेतील कर्मचारी मा.न्यायालयामध्ये अनेक रिट याचिका दाखल करतात. तसेच दूरअंतरावर आश्रमशाळांचे हस्तातर / स्थलांतर केल्याने या आश्रमशाळेतील कर्मचारी त्यांचे समायोजन मुळ जिल्ह्यामध्येच करण्याकरीता मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल करतात.यास्तव मा. न्यायालयामध्ये शासनास नाहक अडचणींना सामोरे जावे लागते.

राज्यातील बंद पडलेल्या आश्रमशाळांबाबत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हील ॲप्लीकेशन क्र.९३८४/२०१४ श्री.संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था व इतर दाखल केली होती. सदरहू प्रकरणी चाळीसगांव जि जळगांव येथे बंद पडलेली आश्रमशाळा चौंडी जि अहमदनगर येथे हस्तांतर / स्थलांतराविरूद्ध मा. सर्वोच्च

न्यायालयामध्ये याचिका दाखल झाली होती. सदर याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने आपले निर्देश दि.०५.०३.२०१९ रोजी दिले आहेत. यानुसार चाळीसगांव जि जळगांव येथे बंद पडलेली आश्रमशाळेचे चौंडी जि अहमदनगर येथे करण्यात आलेले हस्तांतर / स्थलांतर रद्द करून संदर्भ क्र. ०१ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरहू आश्रमशाळा मुळ आश्रमशाळेच्या ठिकाणी किंवा १० कि.मी.च्या परीसरामध्येच सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

यास्तव,शासन निर्णय दि.२४.०४.२०१८ मध्ये नमूद आश्रमशाळा हस्तांतर/स्थलांतर करण्याबाबतची ५० कि.मी.ची अट रद्द करून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार १० कि.मी. अशी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन निर्णय दि.२४.०४.२०१८ मध्ये आश्रमशाळा हस्तांतर / स्थलांतर करण्याबाबत अंतराबाबत नमूद ५० कि.मी. अटीऐवजी १० कि.मी.अशी सुधारणा करण्यात येत आहे. सदरहू शासन निर्णयातील इतर सर्व अटी व शर्ती आहे त्याप्रमाणे लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०७२५१३१९५८७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.07.25 13:29:59 +05'30'

(भा. र.गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई
६) संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
७) विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव,मंत्रालय, मुंबई
८) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९)प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१०) सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
११) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२) निवड नस्ती (विजाभज-२)